# बृहन्मुंबई महानगरपालिका

## प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) खाते

# पुस्तिका 3

## निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अवलंबली जाणारी पध्दत

# पुस्तिका-3
## कलम 4(1)(ब)(iii)
## निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अवलंबली जाणारी पध्दत

मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 78 डी नुसार प्रमुख लेखापाल (पापुमनि) या सांविधिक अधिका-याची नेमणूक करण्यात येते.

अर्थसंकल्प `ग' या नावाने सर्वसाधारणपणे परिचित असलेल्या पाणी पुरवठा व मलनि:सारण खात्याशी संबंधित वित्तिय व प्रशासकीय बाबींसाठी महापालिका आयुक्तांना सल्ला देणारा प्रमुख लेखापाल (पापुमनि) हा प्रमुख महापालिका वित्त व प्रशासन अधिकारी आहे. तसेच अंतर्गत लेखा, वित्त व्यवस्थापन, संग्रह पडताळणी व अर्थसंकल्प `ग' चे लेखा परिरक्षण यांसाठी जबाबदार असलेला तो अंतर्गत लेखा परिक्षक, संग्रह पडताळणीकार तसेच कोषागार अधिकारी सुध्दा आहे.

या खात्याची अधिकारश्रेणीची रचना खालीलप्रमाणे आहेः

प्रमुख लेखापाल (पापुमनि)

▽

उपप्रमुख लेखापाल

▽

लेखा अधिकारी *

▽

लिपिक व तत्सम प्रवर्ग

▽

चतुर्थ श्रेणी कर्मचारी

टीप : - *परिपत्रक क्र.साप्रवि/उपप्रले(आस्था-2)/आरजीसेल/3 दि.16.05.2012 नुसार लेखा अधिकारी (प्रथम श्रेणी) व लेखा अधिकारी (द्वितीय श्रेणी) या पदांचे एकत्रिकरण करुन त्यांचे लेखा अधिकारी असे नामकरण करण्यात आले आहे.

प्रमुख लेखापाल (पापुमनि) खाते हे महापालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या नवीन इमारतीमध्ये आहे. प्रमुख लेखापाल (पापुमनि) यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात आणि त्यांच्या विविध कार्यात मदत करण्यासाठी दहा उप प्रमुख लेखापाल आहेत. या व्यतिरिक्त, कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी शहर, उपनगरे तसेच नगरबाहय विभाग यामधील जवळपास सर्व विभागांमध्ये लेखा अधिका-यांच्या प्रमुखत्वाखाली लेखा युनिट कार्यालये कार्यरत आहेत.

प्रमुख लेखापाल (पापुमनि), उपप्रमुख लेखापाल यांच्या नियंत्रणाखाली आणि विविध उपविभाग/स्वयं लेखा युनिट कार्यालये यांचेमार्फत या खात्याची कामे पार पाडली जातात आणि अशा प्रत्येक उपविभागाचा व लेखा कार्यालयाचा कार्यभार व पर्यवेक्षण लेखा अधिका-याकडे असते.

कार्यपध्दतीः

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प `ग' अंतर्गत विविध खात्यांकडून प्राप्त होणा-या आर्थिक बाबींची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे प्रस्ताव /टिप्पण्यांची महानगरपलिका अधिनियम 1888 मधील विविध तरतूदी, नियम, विनियम, वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेली परिपत्रके, कार्यालयीन आदेश, राज्य शासनाची / केंद्र शासनाची धोरणे इत्यादी बाबी विचारात घेऊन, प्रमुख लेखापाल (पापुमनि) खात्यातील संबंधित उपविभाग / लेखा कार्यालये, वित्तीय कार्यान्वयाचा अंतर्भाव असलेल्या प्रस्तावांची / टिप्पणींची तपासणी / पडताळणी करतात.

छाननीनंतर, प्रस्ताव, जसे प्रकरण असेल त्यानुसार, सक्षम प्राधिका-यांकडे म्हणजेच, उपआयुक्त / अतिरिक्त आयुक्त /महानगरपालिका आयुक्त आणि / किंवा स्थायी समिती व महानगरपालिका यांचेकडे अंतिम निर्णयासाठी सादर केला जातो.